# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 03/11/2023

| अ.क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वरुड 703/2023 कलम 324,504 ,506 भा.द.वि. | देवेंद्र घनश्याम सातपुते वय 28 वर्ष रा. एकदरा ता.वरूड जि. अमरावती | बंडू सुरजुसे वय अंदाजे 40 वर्ष रा. एकदरा ता.वरूड जि.अमरावती | दिलीप चौधरी यांचे शेत बेसखेडा शेतशिवार 20 किमी पुर्व | 02/11/2023 चे 13/30 वा.दरम्यान | 02/11/2023 चे 18/32 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणीं फिर्यादी हा शेतामध्ये जेवण करीत असताना फिर्यादीला शेतामध्ये बकऱ्या चरताना दिसल्या शेतातील पिकांचे नासधूस होऊ नये या कारणाने जेवण करण्याचे सोडून फिर्यादी बकऱ्या शेतातून हाकलण्यासाठी गेला असता आरोपी याने फिर्यादीला म्हटले की, तू माझ्या बकऱ्या कशा काय हाकलल्या त्यावर फिर्यादीने आरोपीला म्हटले की, मी दिलीप चौधरी यांचे शेतामध्ये मजुरीचे काम करीत आहे त्यांनी मला शेतावर लक्ष ठेवण्यासाठी सांगितले होते. तुमच्या बकऱ्या मला शेतात चरताना दिसल्या म्हणून मी हाकल्या करीता आलो त्यावर आरोपी याने फिर्यादीला म्हटले की, शेत तुझ्या बापाचे आहे काय .असे म्हटल्यानंतर फिर्यादी याने आरोपीला म्हटले की ,तुझा माझा बाप कशाला काढतो. या कारणावरून आरोपी याने फिर्यादीला आरोपीच्या हातात असलेला कुराडीच्या दांड्याने डोक्यावर डाव्या पायाच्या पोटरीवर, डाव्या हातावर मारून दुखापत केली. कुऱ्हाडीच्या दांड्याने डोक्याला मार लागल्याने रक्त निघाले व शिवीगाळ करून धमकी देऊन आरोपी आपल्या बकऱ्या घेऊन निघून गेला. वरून सदर गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 2 | वरुड 704/2023 कलम 379 भा.द.वि. | आकाश पुरुषोत्तम बारमासे वय 21 वर्ष रा. जलालखेडा ता.नरखेड जि.नागपूर | गणेश होमलाल नेवारे वय 25 वर्ष रा.वाठोडा ता.वरूड | इंदिरा चौक रिलायन्स जिओ मार्ट समोर 500 मी पुर्व | 01/11/2023 चे 20.30 वा. ते 21/00 वा.दरम्यान | 02/11/2023 चे 20/38 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांची मालकीची हिरो होंडा फॅशन प्लस गाडी क्रमांक MH-31 CX-3059 गाडीवर ड्रायफ्रूट्स किरकोळ काम धंदा करते . फिर्यादी याने आपल्या जवळील काही ड्रायफ्रूट्स विकून शिल्लक राहिलेला माल 1. काजूचे पाच पॅकेट किंमत अंदाजे 500/-रुपये 2.किसमिसचे दोन पॅकेट 200/-रुपये 3.बदामचे तीन पॅकेट 300/-रुपये 4.मसाला 12 पॅकेट 1200/- रू. 5.खारीक बादाम दोन पॅकेट 200/-रू. 6.जायफळ एक पॅकेट 100/- रू. चा असा एकूण 2500/-रुपयाचा माल घरी परत घेऊन जात होते. नमुद घ.ता.वेळी व ठिकाणीं फिर्यादी हे आपल्या घरी परत जात असताना नमूद आरोपी याने फिर्यादीला गाडीवर लिफ्ट मागितली फिर्यादी याने आरोपीला लिफ्ट दिली. फिर्यादी याला काही कामाकरिता घटनास्थळ येथे थांबावे लागले त्यामुळे फिर्यादी याने आपली गाडी व गाडीवर ठेवलेला माल घटनास्थळी उभी करून फिर्यादी हा बाजूच्या दुकानात गेला असता काही वेळानंतर फिर्यादी हा परत आला असता फिर्यादीला त्याच्या गाडीवर ठेवलेला ड्रायफूट चा माल दिसून आला नाही व आरोपी पण दिसून आला नाही. गाडीवर लिफ्ट दिलेल्या इसमाने सदर माल चोरुन नेलेला आहे वरून सदर गुन्हा दाखल करून तपासा घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | वरुड 705/2023 कलम 324,504 भा.द.वि. | राजू शामराव ढोमणे वय 31 वर्ष रा. सुरळी ता.वरूड | राहुल शामराव ढोमणे रा. सुरळी ता.वरूड जि. अमरावती | सुरळी 5 किमी पुर्व | 02/11/2023 चे 19/00 वा.ते 19/30 वा.दरम्यान | 02/11/2023 चे 22/58 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी हा मासेमारीचा धंदा करितो.नमुद घ.ता.वेळी व ठिकाणीं फिर्यादी मासे विकून घरी परत आला व आरोपीं हा पण मासे विकून घरी परत आला. आरोपी याने फिर्यादीला विचारले की तू आज किती रुपयाची मासे विकले तर फिर्यादीने आरोपीला म्हटले की, मी आज 5500/- रुपयाचे मासे विकले असे सांगितले व फिर्यादीने आरोपीस विचारले की, तू किती रुपयाचे मासे विकले असे विचारले तर आरोपीने फिर्यादीला कशाला हिशोब विचारतो असे म्हणून आरोपीने फिर्यादी सोबत शिवीगाळ करून आरोपीचे हातातिल कडे फिर्यादीच्या डोक्यावर डावे डोळयाचे बाजूने मारले त्यामुळे फिर्यादीचे डोक्याचे बाजूला जखम होऊन रक्त निघाले. फिर्यादीची आरोपी सोबत लोंबाझोम्बी झाल्याने फिर्यादी खाली पडला त्यामुळे फिर्यादीचे उजवे हाताचे अंगठ्याला मार लागून रक्त निघाले. वरून सदर गुन्हा दाखल करून तपासा घेतला. |
| 4 | चांदुर रेल्वे 527/2023 कलम 324,504,506, 34 भा.द.वि. | रेखा प्रभाकर बनसोड वय 45 वर्ष रा. ग्राम बागापूर चांदुर रेल्वे | 1.गंगाधर रामचंद्र टोकसे 2.रामचंद्र कचरूजी टोकसे 3.रविता गंगाधर टोकसे 4.प्रीती सुधाकर टोकसे सर्व रा. ग्राम बागापूर ता.चांदुर रेल्वे | बागापुर 9, k m चांदुर रेल्वे ता.चांदुररेल्वे | 02/11/2023 चे 11/00 वा. दरमान | 2/11/2023 चे 17/22 वा. | हकीकत- अशा प्रकारे आहे की नमूद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी पाण्याचे नळ आल्याने पाणी भरत असताना तेथे घराच्या बाहेर आरोपी क्रमांक 1,2,3,4, आले व त्यांनी मला म्हटले की तुमचे बांधकाम चालू आहे त्यामुळे माझे घराचा नळाचा पाईप फुटला नळाचा पाईप फुटला तेव्हा फिर्यादीने आरोपी स म्हटले की आम्ही पाईप फोडला नाही तुमच्या घरच्या संडासचे पाणी आमच्या अंगणात येते त्याचा मला त्रास होतो असे म्हटले तर त्यांनी मला शिवीगाळ केली गंगाधर टोकसे यांनी त्याच्या हातातील काठी मारून जखमी केले तसेच रामचंद्र टोकसे यांनी तेथील वीट उचलून माझे डोक्यावर मारली त्यामुळे डोक्याला बेंड आले व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून सरदार चा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 5 | चांदुर रेल्वे चांदुर 528/2023 कलम 324,323,504, 506,34 भा.द.वि. | रविता गंगाधर टोकसे वय 40 वर्ष रा. ग्राम बागापूर चांदुर रेल्वे | 1 प्रकाश नामदेव बनसोड वय 50 वर्ष 2 रेखा प्रकाश बनसोडरा वय 45 वर्ष ग्राम बागापूर | बागापुर 9, k m चांदुर रेल्वे ता.चांदुररेल्वे | 02/11/2023 चे 11/00 वा. दरमान | 2/11/23 चे 18/30 वा. | हकीकत- अशा प्रकारे आहे की नमूद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी च्या घरी नळाला पाणी येत नसल्याने फिर्यादीने घराच्या मागे जाऊन पाहिले असता फिर्यादीने आरोपीस म्हटले तुमचं बांधकाम चालू आहे त्यामुळे नळाचा पाईप फुटला तुम्ही पाईप फुटला हे आम्हाला सांगितले नाही आम्ही काहीतरी केले असते नळ जोडला असता असे म्हटले तर त्यांनी मला म्हटले की माझ्यामुळे पाईप फुटला नाही असे म्हणून शिवीगाळ करू लागला फिर्यादी काही न बोलता घरात गेले तेव्हा आरोपी क्रमांक एक नंतर हा घराच्या बाहेर उभे असता परत शिवीगाळ करू लागला व त्याच्या हातातील काठीने मारहाण केली व आरोपी क्रमांक दोन ने केस ओढून मारले व माझे सासरे चंद्रकांत टोकसे व सासू सव श्वेताबाई टोपसे हे भांडण सोडवण्यास आले असता आरोपी क्रमांक एक त्याच्या हातातील काठीने डावे हातावर व डोक्यावर मारून जखमी केले व छातीला मुका मार लागला तसेच श्वेताबाई टोकसे हिला डाव्या हातावर काठीने मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवर सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | लोणी 301/2023 कलम 392,342,34, भा.द.वि. | सौ रत्नकला विजय मालाधारी वय 60 वर्ष रा. भिवापूर ता.तिवसा जि.अमरावती ह. मु. महाराज सिंग राजपूत यांच्या शेतात | अज्ञात | लोणी शेत शिवार | 01/11/2023 चे 19/30 वा. ते 02/11/2023 चे 07/00 वा | 02/11/2023 चे 16/10 वा. | हकिकत अशा प्रकारे आहे कि फिर्यादी हिचे पती हे त्यांचे मूळ गावी भिवापूर येथे गेले असता फिर्यादी ही शेतात असलेल्या घरी एकटीच हजर असता दिनांक 01/11/2023 चे. सायंकाळी 07/30. वा दरम्यान दोन अनोळखी इसम तेथे आले असता फिर्यादी ओरडली व तुम्ही कोण आहे असे म्हटले असता यातील दोन अनोळखी इसम फिर्यादी हिच्याकडे धावत आले व त्यांनी फिर्यादीला धाक दाखवून दोन्ही कानातील सोन्याचे टॉप्स 02 नग 02 ग्रॅम चे किंमत 12000/- रु. व गळ्यातील डोरले मण्याची पोत 03 तीन ग्रॅमची 18000/- रू. चे जबरीने काढून घेतले असा एकूण अनोळखी आरोपीने<br>सुमारे 30000/- रु चा. माल आरोपीने धाक दाखवून घेऊन गेले आशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 7 | लोणी 302/2023 कलम 376(2) (n) भा.द.वि. सहकलम 4.6 पोक्सो | एक मुलगी वय 17 वर्ष | प्रवीण किशोर खडसे वय 27 वर्ष | पो. स्टे. लोणी | 26/10/2022 चे 00/01 वा. ते 27/10/2023 चे 17/00 वा. | 02/11/2023 चे 19/35 वा. | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील पीडीता ही गर्भवती असून उपचाराकरिता डफरीन हॉस्पिटल अमरावती येथे दिनांक 27/10/2023 रोजी भरती झाली असून सदरबाबत एम एल सी पोस्टिंग गाडगे नगर अमरावती शहर येथे प्राप्त झाली असता फिर्यादीने जबाब दिला की यातील आरोपी नामे प्रवीण किशोर खडसे याने नमूद घटना तारीख वेळी व ठिकाणी अल्पवयीन पीडिता हिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित करून तिला आठ महिन्याची गर्भवती केले अशा जबाबावरून पो.स्टे.गाडगे नगर येथे अप नंबर 1309/2023 कलम 376(2)(n) भादवी सहकलम 4.6. पोक्सो अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला सदर गुन्ह्याचे घटनास्थळ हे पो.स्टे.लोणी टाकळी हद्दीतील असल्याने सदर गुन्हयाचे मूळ कागदपत्रे पुढील तपास कामी पो.स्टे.लोणी टाकळी येथे वर्ग झाल्याने तसेच सदर गुन्हा हा सीसीटीएनएस प्रणालीवर पोस्टे लोणी टाकळी येथे वर्ग झाल्याने पोस्ट लोणी टाकळी येथे अप नं. 302/2023 कलम 376(2) (n) भा.द.वि. सहकलम 4.6 पोक्सो अन्वये दाखल करून तपासात घेतला. |
| 8 | मंगरूळ चव्हाळा 220/2023 कलम 324,323,504, 34 भा.द.वि. | अब्दुल जावेद अब्दुल सत्तार वय 36 वर्षे व्यवसाय शेती रा. उंबर्डा बाजार ता.कारंजा जि.वाशीम | 1)बंडू काटसर्पे वय 50 वर्ष रा. पापड 2)अंकुश काटसर्पे वय 30 वर्ष रा. पापड | पापड ते वाढोणा रोड वर 20 कि मी पश्चिम | 02/11/2023 चे 19/00 वा. ते 19/30 वाm | 02/11/2023 चे 22/40 वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की,नमूद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्याची टाटा एस गाडी मध्ये मजूर घेऊन उंबर्डा बाजार येथून परतवाडा येते पापड मार्गे जात असताना पापड येथे रस्ता खराब असल्याने गाडी रस्त्याच्या खालून घेतली असताना आरोपी 1 व 2 यांनी फिर्यादीला म्हटले कि गाडी रस्त्याच्या बाजूला का चालवत आहे तुझा बापाचा रस्ता आहे का असे म्हणूंन आरोपी यांनी फिर्यादीला गाडी खाली उतरून लाथा बुक्क्यानी मारहाण केली व शिवीगाळ करून लाकडी काठीने खांद्यावर व डोक्यावर मारले अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडिकल सर्टिफिकेट वरून सदरचा गून्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | माहुली जहागीर 219/2023 कलम 279,337,338 भा.द.वि. | रामदास गंगाधर पडोळे वय 52 वर्ष धंदा शेती (पोलीस पाटील) रा. विठ्ठलापुर (माहुलीजहाँ) ता. जि.अमरावती तर्फे HC अजय रामदास पोटे ब.नं. 1749 पो. स्टे.माहुली जहागीर | अज्ञात चारचाकी कारचा चालक | माहुली जहाँ गावाचे मोर्शी रोडवर MSCB कार्यालयाचे गेट समोर | 31/10/2023 चे 20/30 वा. दरम्यान | 02/11/2023 चे 20/08 वा. | हकीकत अश्या प्रकारे आहे की फिर्यादी आणि फिर्यादी चे जखमी चुलत भाऊ नामे नितीन नारायण पडोळे हे अमरावती येथे सोयाबीन विकण्या करिता त्यांच्या अॅक्टिवा गाडी क्र. MH-27 DD-4756 नी गेले असता ते परत येत असताना एका अनोळखी चारचाकी वाहनाने समोरासमोर धडक मारली त्या मुळे फिर्यादी व फिर्यादीचे भावाच्या डोक्याला मार लागला त्यामुळे त्यांना इलाजा करिता सावदेकर हॉस्पिटल मध्ये भरती केले तसेच फिर्यादी हे सुद्धा गोडे हॉस्पिटल येथे ईलाजा करिता भरती आहे मोर्शी कडून येणाऱ्या चारचाकी गाडीने समोरा समोर धडक मारल्या मुळे गंभीर दुखापत झाली अशा बयान वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता